आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी  १.३० वाजता

२८ जानेवारी २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- विकासदर वाढवण्यासाठी देशातल्या संपूर्ण औद्योगिक परिसंस्थेत सुधारणा करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आवाहन

- उत्तर प्रदेशात बागपतमध्ये धार्मिक महोत्सवासाठी उभारलेला मंच कोसळल्याने ५ जणांचा मृत्यू, ४० जण जखमी

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज देहरादूनमध्ये ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन

**आणि**

- महिलांच्या १९ वर्षाखालील टी - ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत भारताचे स्कॉटलंडसमोर २०९धावांचे आव्हान

**<><><><><>**

केवळ कच्च्या मालाची निर्यात करून विकासाचा वेग वाढणं शक्य नसून विकासदर वाढवण्यासाठी संपूर्ण औद्योगिक परिसंस्थेत सुधारणा करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. भुवनेश्वर इथे उत्कर्ष ओदिशा- मेक इन ओदिशा कॉनक्लेव्हच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संशोधन आणि नवोन्मेषासाठी एक सशक्त परिसंस्था निर्माण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचा मोदी यांनी पुनरुच्चार केला आणि उद्योगांना या प्रयत्नात सरकारसोबत सहकार्य करण्याचं आवाहनही केलं.

**होल्ड बाईट... प्रधानमंत्री**

उत्कर्ष ओदिशा ही ओदिशा सरकारतर्फे आयोजित केलेली एक प्रमुख जागतिक गुंतवणूक शिखर परिषद असून त्याचा उद्देश ओदिशाला भारतातलं एक

आघाडीचं गुंतवणूक केंद्र आणि औद्योगिक केंद्र बनवणं असा आहे. दोन दिवसांच्या या परिषदेद्वारे पाच लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक व्हावी, असं ओदिशा सरकारचं उद्दिष्ट असून यामुळे साडे तीन लाख रोजगारांची निर्मिती होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या बागपत इथं आज भगवान आदिनाथ निर्वाण लाडू महोत्सवासाठी उभारलेला मंच कोसळल्यानं पाच जणांचा मृत्यू झाला, तर ४० हून अधिक जण जखमी झाले. या महोत्सवासाठी तात्पुरत्या स्वरुपात या मंचाची उभारणी केली होती. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी भाविक या मंचावर चढले होते. मात्र, अचानक मंच कोसळला आणि घबराट पसरल्यामुळे सोहळ्यासाठी आलेल्या भाविकांची चेंगराचेंगरी झाली. दुर्घटनेतल्या जखमींना बरौत इथल्या विविध रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. घटनास्थळी बचाव कार्य सुरू असून मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मदतकार्य जलद करण्याचे तसंच जखमींवर योग्य उपचार करण्याचे निर्देश दिले आहेत.

**<><><><><>**

भारतीय रेल्वेने २३ हजार किलोमीटरच्या मार्गिका अद्ययावत केल्या असून यामुळे रेल्वे १३० किलोमीटर प्रति तास वेगानं धावण्यासाठी मदत होणार आहे. तसंच ११० किलोमीटर प्रति तास वेगानं रेल्वे धावू शकणाऱ्या ५४ हजार किलोमीटर मार्गिकाही अद्ययावत केल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली. यामुळे विविध प्रदेश रेल्वेने जोडले जाणार असून रेल्वेची कार्यक्षमता वाढणार आहे. वेग वाढवण्यासाठी मार्गिकांचं अद्ययावतीकरण, प्रगत सिग्नल यंत्रणा, आणि धोका टाळण्यासाठी कुंपण बसवून रेल्वे मार्गिकांचं आधुनिकीकरण करण्यात येत

असल्याचं रेल्वे मंत्रालयानं सांगितलं आहे. चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते डिसेंबर महिन्यादरम्यान रेल्वेच्या कमाईत चार टक्के वाढ झाल्याचंही रेल्वे मंत्रालयानं सांगितलं आहे.

**<><><><><>**

कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करणं, भारत आणि चीन दरम्यान थेट विमान सेवा आणि परस्परांच्या देशातल्या नद्यांची माहिती एकमेकांना देण्याविषयी भारत आणि चीनमध्ये सहमती झाली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्यात काल झालेल्या चर्चेत यावर सहमती झाली. दोन्ही देशाचे राजनैतिक संबंध सुरू व्हायला यंदा ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्तानं दोन्ही देशातले संबंध आणखी दृढ करणे आणि सामान्य नागरिकांमध्ये जनजागृती करण्यावरही दोन्ही देशात सहमती झाली. व्यापार आणि अर्थव्यवस्थेच्या संदर्भात दोन्ही देशांमध्ये अनिर्णित असलेल्या मुद्द्यांवरही चर्चा झाली आणि दीर्घकालीन, पारदर्शक तोडगा काढण्यावर भर दिला गेला. मिस्त्री यांनी या भेटी दरम्यान चीनमधल्या कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय समितीच्या पॉलिट ब्युरोच्या सदस्यांचीही भेट घेतली.

**<><><><><>**

व्यापार आणि गुंतवणूक संबंध दृढ करण्यासाठी ओमान सोबत सर्वंकष आर्थिक भागिदारी कराराच्या चर्चा पुढे नेण्याच्या मुद्द्यावर भारत आणि ओमानमध्ये चर्चा झाली. वाणिज्य मंत्री पीयूष गोयल आणि ओमानचे वाणिज्य मंत्री क्वायस बिन मोहम्मद अल युसुफ यावेळी उपस्थित होते. दोन्ही देशांच्या संयुक्त

आयोगाच्या बैठकीत या करारावर आणखी विस्ताराने चर्चा होईल, अशी आशा दोन्ही नेत्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

सागरी सीमा हद्दीचा भंग केल्याप्रकरणी १३ भारतीय मच्छीमारांना श्रीलंकेच्या नौदलानं अटक केली. हे सर्वजण तामिळनाडूचे आहेत. यावेळी झालेल्या गोळीबारात दोन मच्छिमार जखमी झाले असून त्यांच्यावर जाफना इथं रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मच्छीमारांना अटक झाल्यानंतर त्यांच्या गावांमध्ये प्रचंड उद्रेक झाला असून त्यांच्या सुटकेसाठी संबंधित यंत्रणांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी त्यांच्या कुटुंबियांनी आणि गावकऱ्यांनी केली आहे.

<><><><><>

मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा आरोपी तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा झाला आहे, मात्र त्याच्या प्रत्यार्पणाची तारीख अद्याप स्पष्ट झालेली नाही. २००८च्या नोव्हेंबर महिन्यात मुंबईवर हा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यातल्या सहभागामुळे दोषी ठरल्यानंतर त्याच्या प्रत्यार्पणाला विरोध करणारी याचिका त्याने दाखल केली होती. मात्र, गेल्या आठवड्यात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं त्याची याचिका फेटाळल्यानंतर अमेरिकेचा परराष्ट्र व्यवहार विभाग त्याच्या प्रत्यार्पणासाठी पुढची प्रक्रिया सुरू करणार असून लवकरच त्याचं प्रत्यार्पण केलं जाण्याची शक्यता आहे.

<><><><><>

निवृत्तीनंतरचे विशेष लाभ मिळावेत आणि  अन्य काही मागण्या करत बांग्लादेशातल्या रेल्वे कर्मचाऱ्यांनी आजपासून संप पुकारला. याचा मोठा परिणाम

रेल्वे वाहतुकीवर झाला आहे. संपावर तोडगा काढण्यासाठी रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी, ट्रेन चालक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांत झालेली बैठक निष्फळ ठरली.

देशातील रेल्वे वाहतूक बंद पडल्यानं नागरिकांना मोठा त्रास होत आहे. नागरिकांचा त्रास कमी व्हावा, यासाठी बांग्लादेश रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशननं विशेष बस सेवा सुरू केल्या आहेत.

**<><><><><>**

इस्रायली सैन्यानं युद्धबंदी कराराअंतर्गत गाझापट्टीतून माघार घ्यायला सुरुवात केली आहे. त्यानंतर हमासनं या आठवड्यात तीन इस्रायली ओलिसांना सुपूर्द करायला सहमती दर्शवल्यानंतर काल गाझामधल्या पॅलेस्टिनी नागरिकांची सुटका करण्यात आली. हमासने दक्षिण इस्रायल भागावर केलेल्या हल्ल्यानंतर सुरू झालेल्या युद्धात गाझाच्या उत्तर भागातले सुमारे साडे सहा लाख पॅलेस्टिनी नागरिक विस्थापित झाले होते.

**<><><><><>**

कांगो या देशात सुरू असलेला संघर्ष आटोक्यात आणण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघानं पुढाकार घेत कारवाई सुरू केली आहे. या कारवाईत भारतासह अन्य देश सहभागी घेतल्याबद्दल संयुक्त राष्ट्राच्या शांती सेनेचे प्रमुख जीन पियरे लॅक्रोइक्स यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

कांगो गणराज्यात मार्च २३ मूव्हमेंट आणि एम-२३ गटांनी बंडखोरी करत संघर्ष सुरू केला आहे. बंडखोरांनी गोमासह अन्य काही शहरांवर नियंत्रण मिळवले आहेत. गेल्या आठवड्यात संयुक्त राष्ट्राच्या शांती सेनेवर बंडखोरांनी केलेल्या हल्ल्यात शांती सेनेतील तीन सैनिक शहीद झाले होते. यात दक्षिण आफ्रिकेतील दोन तर उरुग्वेच्या एका सैनिकाचा समावेश आहे. भारताचे अकराशे सैनिक आणि

१६० पोलिस कर्मचारी या मोहिमेत सहभागी असून ते सर्वजण सुरक्षित आहेत. दरम्यान, संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेनं कांगो इथं बंडखोरांनी केलेल्या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उत्तराखंडच्या देहरादून इथल्या महाराणा प्रताप स्टेडियमवर ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन करणार आहेत. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री, भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे पदाधिकारी आणि राष्ट्रीय खेळाडू उपस्थित राहणार आहेत.

उत्तराखंडमधल्या आठ जिल्ह्यातल्या ११ शहरांत १४ फेब्रुवारीपर्यंत ही स्पर्धा चालणार आहे. स्पर्धेचं औपचारिक उद्घाटन होण्याआधी २६ जानेवारीला उधमसिंगनगरच्या गोलापूर इथं झालेल्या ट्रायथलॉन स्पर्धेत मणिपूर आणि महाराष्ट्रानं पदकं जिंकली आहेत.

**<><><><><>**

१९ वर्षांखालील महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर सिक्सच्या फेरीतल्या अंतिम सामन्यात भारतानं स्कॉटलंडसमोर २०९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. भारताची सलामीवीर गोंगदी त्रिशाने नाबाद ११० धावा केल्या. अवघ्या ५९ चेंडूंमध्ये १३ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने तिनं ही कामगिरी केली.

**//<><><><><>//**